| MHKO200009132017 | **नियमीत दरखास्त क्रं. ५३/२०१७ मधील नि.१३३ खाली आदेश**<br>**खंडेराव भाऊ देसाई विरुध्द चंद्रकांत गजानन कदम वगैरे** |
|---|---|

**०१.** प्रस्तुत अर्ज वि.प. क्रं.४ यांनी त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वि.प.क्रं.४ यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तुत दरखास्तदार यांनी ज्या आदेशाविरुध्द दरखास्त दाखल केली आहे त्या कामी वि.प.क्रं.४ हे पक्षकार नव्हते. त्यामुळे सदर दावेचे कामी झालेला आदेश अगर हुकुमनामा प्रस्तुत वि.प.क्रं.४ यांचेवर बंधनकारक नाही असे असतानाही वि.प.क्रं.४ यांना सदर दरखास्त कामी पक्षकार केले आहे. त्यामुळे वि.प.क्रं.४ यांनी जानुन-बुजून मे. कोर्टात हजर राहणेस टाळाटाळ केलेली नाही. सदरचा अर्ज मंजूर केलेस दरखास्तदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केलेस वि.प.४ यांचे कशानेही भरुन न येणारे असे नुकसान होणार असून त्यांना त्यांचे न्याय हक्कापासून वंचीत रहावे लागणार आहे. त्यामुळे वि.प.क्रं.४ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करावा अशी विनंती केली आहे.

**०३.** दरखास्तदार यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्रं.१४० वर दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा वि.प.क्रं.४ यांचा अर्ज कायदयातील तरतुदीविरुध्द असून तो चालणेस पात्र नाही. वि.प.क्रं.४ यांना नोटीस लागू होऊनही ते कोर्टात हजर न राहिल्याने व म्हणणे न दिलेने त्यांचे विरुध्द दि. ०१.०४.२०१६ रोजी एकतर्फा आदेश झाला आहे. वि.प.क्रं.२ हा वि.प.क्रं.४ ची बायको सौ. छाया हिचा सख्खा भाऊ असनू वि.प.क्रं.३ चा जावई आहे. वि.प.क्रं.२ व ३ हे मौजे वाळवेकरवाडी येथे राहतात. वाळवेकरवाडी हे गाव मौजे काटेभोगाव गावचाच भाग होता. त्यामुळे वि.प.क्रं.४ याचे त्याचे सासरवाडीत येणे-जाणे होते.

तसेच वि.प.क्रं. २ व ३ यांचे वि.प.क्रं.४ यांचेकडे नेहमी येणे जाणे असते. त्यामुळे वि.प.क्रं.४ हा नेहमी या कामामध्ये वि.प.क्रं.२ यांचे बरोबर नेमले तारखेस मे. न्यायालयाच्या आवारात हजर असतो. त्यामुळे वि.प.क्रं.४ याने कोणतेही संयुक्तीक कारण या अर्जामध्ये नमुद केलेले नाही त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती दरखास्तदार यांनी केली आहे.

**०४.** दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जाचे स्वरुप लक्षात घेता वि.प.क्रं.४ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश हा रद्द करुन वि.प.क्रं.४ यांना अर्जात त्यांची बाजू मांडण्यासाठी सदरचा अर्ज मंजूर करणे उचित होणार आहे. तसेच अर्जाची सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे तसे न केल्यास अर्जात गुंतागुंत निर्माण होऊन अर्जाचा निर्णय देताना अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे अर्जाच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी हा अर्ज वि.प.क्रं.४ विरुध्द खर्च बसवून मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**०६.** अंतिमरित्या मी खालील प्रमाणे आदेश करते.

**आदेश.**

१. सदरचा अर्ज वि.प.क्रं.४ यांनी दरखास्तदार यांना रक्कम रुपये ३००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला.

२. वि.प.क्रं.४ यांनी सदर आदेशाची पुर्तता पुढील तारखेच्या आत करणेची आहे.

Honey Mukesh Patel

Digitally signed by Honey Mukesh Patel
Date: 2024.11.21 15:19:20 +0530

दि.२२.११.२०२४.
कळे-खेरीवडे.

(एच.एम.पटेल)
अति.सह.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे-खेरीवडे.